# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे

फोन नं. ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट २३५-२२ दिनांक ०२/०८/२०२२

## घरफोडी करणाऱ्या महिला आरोपीस अटक करुन एकुण ७,४४,६५६/- रु. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत-नालासोपारा पोलीस ठाणेची कामगिरी.

दिनांक १९/०७/२०२२ रोजी फिर्यादी श्रीमती मरीयम सरवर खान वय-५६ वर्षे रा. डांगेवाडी, नालासोपारा यांनी नालासोपारा पोलीस ठाण्यात येऊन तक्रार दिली की, त्या दिनांक १०/०७/२०२२ रोजी त्यांचे मुलाकडे माहिम, मुंबई येथे बकरी ईद सणानिमीत्त गेल्या होत्या. घरातुन जाताना त्यांनी घराचे कुलूप बंद केले होते. त्यानंतर फिर्यादी या दिनांक १८/०७/२०२२ रोजी रात्री उशीराने त्यांचे घरी परत आल्या असता त्यांना त्यांच्या घरातील कपाट तुटलेले दिसले. त्यांनी कपाटाची पाहणी केली असता त्यांनी त्यात ठेवलेले २०६.६४० ग्रॅम वजनाचे ७,४४,६५६ /- किंमतीचे सोन्याचे दागिने चोरी झालेले दिसुन आले. सदरबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन नालासोपारा पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ३११/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला होता.

नालासोपारा पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रामध्ये घडलेल्या सदर गुन्हयाचे व परिस्थीतीचे गांभीर्य लक्षात घेवून वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे नालासोपारा पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचा तपास सुरु केला. घटनास्थळावरील प्राप्त पुरावे व तांत्रिक माहितीच्या आधारे गुन्हयाचा तपास केला असता सदरचा गुन्हा हा एका अनोळखी बुरखाधारी महिलेने केला असल्याची माहिती मिळाली. सदर संशयीत महिलेचा शोध घेतला असता सदर सशंयीत महिला वय-२६ वर्षे रा. माहिम, मुंबई येथील राहणारी असल्याने तिला दिनांक २५/०७/२०२२ रोजी अटक करण्यात आली. अटक महिला आरोपीकडे अधिक तपास करता तीने सदरचा गुन्हा केला असल्याची कबुली दिली.

नमुद महिला आरोपीस मा. न्यायालयासमक्ष हजर केले असता दिनांक ०१/०८/२०२२ रोजीपर्यंत पोलीस कोठडी मंजुर असून तीचेकडून गुन्हयातील चोरीस गेलेले सर्व २०६.६४० ग्रॅम वजनाचे ७,४४,६५६ /- किंमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०३, श्री चंद्रकांत जाधव, सहा. पो.आयुक्त नालासोपारा विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री विलास सूपे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नालासोपारा पोलीस ठाणे, श्री राहुल सोनावणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) गुन्हे प्रकटिकरण पथकाचे सपोनि/पंडीत मस्के, सपोनि/अमोल तळेकर, पोहवा/किशोर धनु, पोना/सचिन कांबळे, पोना/अमोल तटकरे, पोशि/कल्याण बाचकर, पोशि/राजेश नाटुलकर, मपोशि/ जया पाचंगे, पोना/ढोणे ( नेमणुक-पोलीस उप आयुक्त कार्यालय ) यांनी केलेली आहे.


महाराष्ट्र पोलीस